अंक ५१ वा वर्ष ५५ वे

# विनयन

नियतकालिक : २०२०-२१



खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे

## शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव

(NAAC Reaccredited 'A' Grade)

प्राध्यापक प्रबोधिनी अंतर्गत
ई–कंटेंट विषयावर प्रा. गुल्हाणे
अमरावती यांचे व्याख्यान






जळगाव विभाग
आंतरमहाविद्यालयीन
हॅन्डबॉल स्पर्धा

जळगाव विभाग
आंतमहाविद्यालयीन
हॅन्डबॉल स्पर्धेचे उद्घाटन





विद्यापीठ निर्देशानुसार आयोजीत
महापुरुष अभिवादन समारंभ

खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे

# शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव

# विनयन

## नियतकालिक २०२०–२०२१


: प्रकाशक :

**प्राचार्य डॉ. अशोक राणे**

**उपप्राचार्य डॉ. केतन चौधरी**

**प्रा. निलेश जोशी**

: संपादक :

**प्रा. स्वाती चव्हाण**

**प्रा. पंकज पाटील**

: विद्यार्थी प्रतिनिधी :

**इंगळे खुशबू राजेंद्र**

**पावरा सुनिता सुरसिंग**

: छायाचित्र :

**श्री. मोहन चौधरी, विजय चव्हाण**

: मुद्रक :

**अथर्व पब्लिकेशन्स्**

शॉप नं. २, नक्षत्र अपार्टमेंट, शाहूनगर हौसिंग सोसायटी,

तेली समाज मंगल कार्यालयासमोर, जळगाव– ४२५ ००१. **संपर्क :** ९४०५२०६२३०



या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# अंतरंग


| अ.न. | नाव | विषय |
|---|---|---|
| १ | स्विटी प्रभाकर तायडे | विद्यार्थी ............ ११ |
| २ | स्विटी प्रभाकर तायडे | छात्र फेल क्यो होते है ??? ............ ११ |
| ३ | स्विटी प्रभाकर तायडे | हिंदी कि दशा ............ १२ |
| ४ | स्विटी प्रभाकर तायडे | Life ............ 12 |
| ५ | रोहिणी भास्कर तायडे | शब्द ............ १३ |
| ६ | भावना वामन झाडगे | 'म' मऱ्हाटीचा ............ १३ |
| ७ | भावना वामन झाडगे | निर्भया ............ १४ |
| ८ | भावना वामन झाडगे | हास्यतरंग ............ १६ |
| ९ | किशोर हरी चव्हाण | कौतुकावर अंकुश ............ १६ |
| १० | अंकिता विजय मगर | माझा जिल्हा माझा अभिमान ............ १७ |
| ११ | रोमाली अशोक वाघुळदे | महाराष्ट्र देशा ............ १८ |
| १२ | रोमाली अशोक वाघुळदे | माहेर ............ २० |
| १३ | सोनाली पांडुरंग पाटील | Soldiers Daughter ............ २० |
| १४ | गिरीश भगवान सैंदाणे | ओझोन छत्री का महत्त्वाची आहे (संग्रहित लेख) ............ २१ |
| १५ | सुवर्णा छगन अंबोरे | रक्षाबंधन ............ २२ |
| १६ | सुवर्णा छगन अंबोरे | दान ............ २२ |
| १७ | सुवर्णा छगन अंबोरे | मैत्री ............ २३ |
| १८ | सुवर्णा छगन अंबोरे | आई ............ २३ |
| १९ | सारिका प्रकाश कोळी | रेतीचा कण ............ २४ |
| २० | सारिका प्रकाश कोळी | खोप्यामधी खोपा ............ २५ |
| २१ | विशाखा अटवाल | सांज ............ २५ |
| २२ | चेतना मधुकर वानखेडे | जीवन म्हणजे काय ............ २६ |
| २३ | दिक्षा रमेश आठवले | खरा तो एकची धर्म ............ २६ |
| २४ | राज महेंद्र देशमुख | 'द' काश्मीर फाईलच्या निमित्ताने ............ २७ |
| २५ | डॉ. शैलजा भंगाळे | Research Center ............ 30 |
| २६ | मोनिका रमेश साळुंके | राष्ट्रभाषा के बारे में गांधीजीके विचार ............ ३२ |
| २७ | माधुरी भारत पगारे | माहिती तंत्रज्ञानाचा विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम ............ ३३ |
| २८ | Snehal R. Chkhale | VISVA- BHARTI ............ 34 |
| २९ | दिक्षा रमेश आठवले | माहितीचा अधिकार काळाची गरज ............ ३७ |
| ३० | रेखा शिवाजी हरणे | मी पाहिलेली महामारी ............ ३७ |
| ३१ | दिक्षा रमेश आठवले | Degree Obbreviations ............ ३९ |
| ३२ | हिमशुका सतिष पाटील | क्यो डर लगता है ............ ४० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३ | वर्षा सुनिल सैंदाणे | भयंकर कोण? कोरोनाचा कहर की अफवांचा जहर......... | ४० |
| ३४ | प्रा. प्रविण कोल्हे | राष्ट्रीय सेवा योजना विभाग वार्षिक अहवाल................ | ४२ |
| ३५ | | राष्ट्रपुरुष लोकमान्य टिळक पुण्यतिथी कार्यक्रम अहवाल ... | ४५ |
| ३६ | | हिंदी विभाग अहवाल...................................... | ४६ |
| ३७ | | महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती अहवाल........ | ४६ |
| ३८ | | शिक्षक दिन कार्यक्रम अहवाल.............................. | ४६ |
| ३९ | | विज्ञान मंडळ अहवाल...................................... | ४७ |
| ४० | | विद्यार्थी कल्याण विभाग अहवाल........................... | ४८ |
| ४१ | | भूगोल मंडळ अहवाल...................................... | ४८ |
| ४२ | | नेट व सेट कार्यशाळा अहवाल.............................. | ४९ |
| ४३ | | लैंगिक छळ निवारण कक्ष अहवाल ......................... | ४९ |
| ४४ | | संशोधन कक्ष अहवाल...................................... | ५० |
| ४५ | | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चा अहवाल ..................... | ५१ |
| ४६ | | Student Council for College Work 2020-21 ....... | ५४ |
| ४७ | | महिला लैंगिक शोषण तक्रार निवारण समिती............... | ५५ |
| ४८ | | अहवाल विभाग............................................. | ५५ |



## अध्यक्षांचे मनोगत...

खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीच्या शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयात एकूण ५६ वर्षांची उज्वल शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरा व शैक्षणिक गुणवत्ता यांचे नियमित संवर्धन होऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास केला जातो. यासाठी व्यवस्थापन परिषद सातत्याने मार्गदर्शन करून नियंत्रण करीत आहे. शासनाच्या आणि विद्यापीठाच्या सर्व योजनाचा महाविद्यालयात लाभ मिळण्यासाठी प्राचार्य आणि सर्व शिक्षक व कार्यालयीन कर्मचारी सतत कार्यरत असतात. यामुळे महाविद्यालयाचे एनसीटीई आणि NAAC या संस्थेकडे नियमित अहवाल सादर केलेले असून शिक्षणाचा दर्जा सतत उंचावत राहण्यासाठी सर्व स्टाफ कार्यमग्न असतो.

या महाविद्यालयात बी.एड.,एम.एड., बी.पी.एड. आणि एम.पी.एड. या शिक्षणक्रमांचे अध्यापन केले जाते. तसेच शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता आहे. आजपर्यंत ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी शिक्षणशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. तसेच अनेक विद्यार्थी संशोधन करीत आहे. या महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा खेळ आणि क्रीडा क्षेत्रात विविध कौशल्य विकसित करण्यासाठी संस्थेने एकलव्य क्रीडा संकुलाची उभारणी करून खेळासाठी अद्ययावत सुविधा उपलब्ध केल्या आहेत. महाविद्यालयात खेळातील कौशल्य विकसित होण्यासाठी विद्यापीठ मान्यता प्राप्त प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केले आहेत. महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी फी सवलत घेऊन सदर प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केला आहे.

राष्ट्रीय स्तरावर नवनवीन शैक्षणिक विषयांवर महाविद्यालयात राष्ट्रीय व विद्यापीठ स्तरावरील परिषदांचे व चर्चासत्रांचे नियमित आयोजन केले जाते. त्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यात शैक्षणिक विचारांचे आदान-प्रदान होते. तसेच हुशार व गरजू विद्यार्थ्यांना संस्थेच्या स्तरावर शिष्यवृत्ती देऊन आर्थिक मदत केली जाते, तसेच सवलतीच्या दरात वसतिगृहाची सुविधा दिली जाते. महाविद्यालयातील विद्यार्थी दरवर्षी विद्यापीठ परीक्षेत गुणवत्ता यादीत झळकतात. त्यामुळे दरवर्षी विद्यार्थ्यांमध्ये प्रवेश घेण्यासाठी स्पर्धा असते. महाविद्यालयाच्या विनयन वार्षिक अंकास शुभेच्छा !!!

**– प्रज्ञावंत नंदकुमार बेंडाळे**

अध्यक्ष, के.सी.ई.सोसायटी, जळगाव



## प्राचार्यांचे मनोगत...

प्रिय विद्यार्थी मित्रहों,

खान्देश कॉलेज एयुकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ नियतकालिक 'विनयन' प्रकाशित करताना आनंद होत आहे. आपल्या महाविद्यालयाला ५५ वर्षे पूर्ण झालेली आहे. महाविद्यालयाचे व्हीजन ''यावजीवम्मधिते विप्र:'' असे आहे. प्रत्येक शिक्षकाने आजीवन शिक्षण सुरु ठेवून ज्ञानदान करीत जावे असा बोध आपणाला घेता येईल. महाविद्यालयाचे मिशन "To impart relevant quality training programmes of education to students to make them knowledgeable, competent skillful teachers for the emerging society." असे आहे. यातुन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विविध गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून सुजाण, कार्यक्षम आणि कुशल शिक्षक तयार करण्याचा सतत प्रयत्न असतो. यासाठी व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष मा.नंदकुमार बेंडाळे व व्यवस्थापन मंडळातील सर्व सन्माननीय सदस्यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य मिळत असते.

मा. न्यायमूर्ती वर्मा आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार संपूर्ण देशात एन.सी.टी.ई. रेग्युलेशन ॲक्ट २०१४ नुसार या वर्षापासून बी.एड., एम.एड., बी.पी.एड. या शिक्षणक्रमांचा कालावधी दोन वर्षाचा झाला आहे. कार्यक्षम व गुणवत्तापूर्ण शिक्षक तयार होण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रमात अमूलाग्र बदल झाला आहे. त्यात योग, कला आणि संगीत शिक्षण तसेच आंतरवासिता उपक्रम यासारख्या नविन आशयज्ञानाचा समावेश अभ्यासक्रमात झालेला आहे. त्यामुळे शिक्षक होण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेल्या विद्यार्थ्यांनीच या शिक्षणक्रमात प्रवेश घेतला आहे या दोन वर्ष अभ्यासक्रमाची फलश्रुती भविष्यात निश्चितच दिसेल.

या वर्षात बी.एड्. शिक्षणक्रमास एकूण १५०, एम.एड., ९ बी.पी.एड.१०० आणि एम.पी.एड्.ला ३० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला असून प्रथम वर्षाचा या सर्व प्रथम वर्षाचा निकाल सरासरी ९५ टक्के पेक्षा जास्त आहे. एस.वाय.एम. पी.एड. विभागांचा निकाल ९६ टक्के, एस.वाय.बी.पी.एड. ८५ टक्के एस.वाय.बी.एड. विभागाचा निकाल ९६ टक्के आणि एस.वाय.एम.पी.एड. ९५ टक्के आहे. या सर्व यशवंतांचे मनापासून अभिनंदन!

महाराष्ट्र शासनाच्या ना-हरकत प्रमाणपत्र समितीने आणि विद्यापीठाच्या समितीने महाविद्यालयाची पाहणी करून सर्व विभागांना ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केले आहे. त्यानुसार विद्यापीठाने सर्व विभागांना संलग्नता प्रदान केलेली आहे.

महाविद्यालयाच्या संशोधन विभागातंर्गत ३ प्राध्यापकांनी संस्था पातळीवर संशोधन प्रकल्प हाती घेतले आहे. तसेच महाविद्यालयातील पीएच.डी. मार्गदर्शक प्राध्यापकांच्या मार्गदर्शनानुसार दोन विद्यार्थ्यांना पीएच.डी.पदवी प्रदान झालेली आहे. वर्षभरात महाविद्यालयात विविध मान्यवर प्राध्यापकांनी नैमित्तिक भेटी देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलेले आहे. तसेच शासनाचे, विद्यापीठाचे, यु.जी.सी. कडून आलेल्या पत्रानुसार विविध सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमांचे व क्रीडा स्पर्धांचे यशस्वीरित्या आयोजन करून संबंधीत विभागांना अहवाल सादर केलेले आहे.

प्रत्येक विद्यार्थी आणि शिक्षकाने आहार, विहार आणि विचारांचे आचरणात पालन केल्यास सक्षम, सुजाण नागरिक निर्माण होण्यास मदत होते. म्हणून प्रत्येकाने आपल्या मनावर अधिराय प्रस्थापित करता यावे यादृष्टीने कर्तव्य निष्ठेची जाणीव ठेवून संयमी जीवन जगले पाहिजे. त्यासाठी सदैव मन प्रसन्न ठेवून आचरण केले पाहिजे.

विनयन नियतकालिकाच्या या अंकासाठी लेखन करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे मनापासून अभिनंदन करतो व  विनयन या नियतकालिकास हार्दीक शुभेच्छा देतो.

**डॉ.अशोक रामचंद्र राणे**
प्राचार्य

# संपादकीय

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

प्रिय, विद्यार्थी शिक्षक मित्र मंत्रिनींनो, विनयन या नियतकालिकेचा अंक आपल्या हाती देतांना विशेष आनंद होत आहे. आमच्या महाविद्यालयातील 'विनयन' या नियतकालिका मार्फत आम्ही आमच्या महाविद्यालयातील कामकाज आणि विशेष उपक्रमांचा सारांश मांडण्याचा एक प्रयत्न विद्यार्थ्यांच्या सहाय्याने करीत असतो. विद्यार्थी अभ्यासपूरक विविध उपक्रमांच्या माध्यमातून त्याचे सुप्त कलाविष्कार आणि गुण प्रदर्शित करीत असतात. या प्रशिक्षण करीत असतात. या प्रशिक्षण महाविद्यालयात शिक्षक आणि विद्यार्थी असे जिव्हाळयाचे नात अनुभवलं जे कॉलेज जीवनात कधीही अनुभवल नव्हत अशी आपली बोलकी प्रतिक्रिया आपण नोंदवून गेल्यामुळे या बदलत्या काळातही गुरु-शिष्य नात्यातील धार कायम ठेवून आपण महाविद्यालयाचे नाव यशो शिखरावर न्याल यात शंका नाही. आपल्यातील सृजनशीलता, विविध उपक्रम, रांगोळी स्पर्धा, नाट्यछटा, स्पर्धा परीक्षेतले यश, प्राध्यापकांचे विशेष प्राविण्य यश, याचा उल्लेख विनयन मथुन आम्ही जिवत ठेवणार आहोत.

कोविड- १९ महामारीमुळे दूर दुश्य प्रणाली पध्दतीने विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेतून समाजकार्य, विविध सांस्कृतिक कार्यक्रम सहभाग, विविध स्पर्धा यातून सहभाग  नोंदविणे प्राचार्यांनी भाग पाडले.

विनयनसाठी डॉ. अशोक राणे, सर उपप्राचार्य डॉ. डॉ केतन चौधरी आणि प्रा. निलेश जोशी व सर्व प्राध्यापक वृंदाचे मोलाचे सहकार्य लाभले धन्यवाद !

संपादक

**प्रा. डॉ. स्वाती वसंतराव चव्हाण**

**प्रा. पंकज रविंद्र पाटील**

# विद्यार्थी

– **तायडे स्वीटी प्रभाकर**
द्वितीय वर्ष बी.एड.

टीचर आपकी कसम, मॅडम आपकी कसम,
सारी रात पडते हम फिर भी नंबर पाते कम,
बताओ क्या करे हम...।

पहिला नंबर है अंग्रेजी जिसमे तलती
गरम जलेबी
बताओ क्या करे हम...।

दुसरा नंबर है हिंदी जिसके माथे बिंन्दी
बताओ क्या करे हम...।

तिसरा नंबर हे गणित जिसमे धुला हुआ अमृत
बताओ क्या करे हम...।

चौथा नंबर है इतिहास जिसमे लिखा हुआ है
बकवास बताओ क्या करे हम...

पाचवा नंबर है भूगोल जिसमे सारे दुनिया गोल
बताओ क्या करे हम...।

टीचर आपकी कसम, मॅडम आपकी कसम,
सारे रात पडते हम फिर भी नंबर पाते कम
बताओ क्या करे हम...।

# छात्र फेल क्यो होते हैं...???

– **तायडे स्वीटी प्रभाकर**
द्वितीय वर्ष बी.एड.

साल मे हे कोण ३६५ दिन
बचा लो उस मे से एक दिन
बचे बाकी ३६४ दिन
आओ हिसाब लगाए
रोज १२ घंटे सोट है।
सब मिलाकर १८२ दिन होते है।
और १८२ दिन बन जाते है।
नहाने धोने मे, खाने-पीने में, जो ५ घंटे लगते है।
वह ३० दिन बन जाते है।
बाकी १५२ दिन बच जाते है।
साल मे ५१ रविवार आते है।
अब हमारे पास है १०१ दिन
२५ दिन त्योहार मनाये जाते है।
बाकी ७६ दिन बच जाते है।
दिन ५० छुटिया सर्दीयो की
मिल कर ६० दिन हो जाते है।
बाकी बचे १६ दिन और वो परीक्षा मे बीत जाते है।
और बचाया एक दिन उसी मे तो पढ पाते है
उसमे भी समुद्र जितना पढना होता है।
नदी जितना पर पाते है।
बालटी भर याद रहता है।
ग्लास भर लिख कर आते है।
चुल्लू भर नंबर आते है। और उसी मे हम डूब जाते है
फिर फेल हो जाते है....

# हिन्दी की दशा

– तायडे स्वीटी प्रभाकर
द्वितीय वर्ष बी.एड.

जब छोटा होता है कोई बच्चा
तो सबकुछ बोलता है सच्चा
धीरे धीरे शुरू होती है झूट की दास्तां
तो मुश्किल हो जाता है जीवन का रास्ता ।

सभी कहते है हिंदी हमारे हे राष्ट्रभाषा
और हर जीवन की हे आशा
पर मुझे तब होती है निराशा जप पढे लिखे
मंत्री गरीबो को अंग्रेजी मे देते है दिलासा ।

जब गरीब है अनपढ तो कैसे समज पाएगा
और मंत्रीजी का भाषण खुद के पास ही रह जाएगा
जो मंत्री शपथ लेते है हिंदी को सुदृढ बनाते बनाने की
वही असल में बात करते है अंग्रेजी को आगे लाने की ।

विदोशों मे उनकी राष्ट्रभाषा को तबज्जो दी जाती है
जबकी हमारे देश में अधिकतर मंत्रियो को इंग्रजी ही
याद आती है।

संसद है राष्ट्रीय सदन उसमें भी अधिक है अंग्रेजी का चलन
और धीरे धीरे हिन्दी का इस देश में हो गया हे पतन।

हिंदी रह गई केवल नाम मात्र भाषा
यहा मैं करती हु खुलासा।

थोडी सी अपने दिल को दे- दो दिलासा
अगर ऐसा ही हाल रहा तो वस्त्र रुपी अंग्रेजी
भविष्य में पहनो।

हिंदी हमारी है जान,
पर अत्याधिक लोक नही रहे हे मान।

अगर हिंदी को करना है पक्का
तो विदेशी भाषाओ को मारे धक्का ।

यदी हिंदी को मजबूत बनाने के लिए भागे
तो देखना दुनिया पीछे पीछे और हम आगे
क्योंकी किस्से जागे की एकता

हर किसी के मन मे रहेगी एक दुजे के प्रति नेकता
यह मै रही हू देखती की कौन कितने कम समय
में विदेशी भाषाओ को हे फेंकता।

यदी हिन्दी मजबूत हो जाए तो यह लो मान
कीबस अब दुनिया में अपने ही रहेगी शान
और रहे सदा मेरा भारत महान।

# Life

- Sweeti Prabhakar Tayade
S.Y.B.Ed

Life is a long journey,
With lots of stations.

Life is an unsolved puzzle,
With a lots of tension.

Life is a book of errors,
Always teaching us lessons.

Life is a wonderful symphony,
providing us smooth Sensation.

Life is a best friend,
Who shares with us various emotions?

Life is just a game,
Acts enjoy playing it.

# शब्द...

– रोहिणी भास्कर तायडे
द्वितीय वर्ष बी.एड.

शब्द शोधला तर अर्थ आहे,
वाढला तर कलह आहे.

शब्द सोसला तर सांत्वन आहे,
आणि झेलला तर आज्ञा आहे

शब्द अक्षय पण आहे आणि...
निःशब्द पण आहे...

शब्दांनीय शिकवलय,
पडता पडता सावरायला

शब्दांनीय शिकवलय
रडता रडता हसायला...

शब्दांमुळे होतो एखाद्याला घात
आणि शब्दांमुळेच मिळते,
एखादयाची आयुष्यभर साथ...
शब्दांमुळे जुळतात
मनामनाच्या तारा आणि
शब्दांमुळेच चढतो एखादयाचा पारा,

शब्दच जपून ठेवतात, मनामनांच्या
त्या मधुर मधुर आठवणी,
आणि शब्दांमुळेच तरळते
कधी कधी डोळ्यांत पाणी,

हळवी असतात मने जी शब्दांनी
कोलमोडली जातात,

अन् शब्द असतात जादुगर
ज्यानी माणसे जोडली जातात...
(संग्रहित कविता)

# 'म' मऱ्हाटीचा

– भावना वामन झाडगे
प्रथम वर्ष बी.एड.

''माझ्या मराठी मातीचा लावा ललाटास टिळा,
हिच्या संगाने जागल्या दोऱ्या खोऱ्यातील शिळा...''

या कुसुमाग्रजांच्या मराठीची महिती सांगणाऱ्या ओळी आहेत. आपण म्हणतो मराठी सर्वत्र बोलली गेली पाहिजे तिला जपलं पाहिजे, निदान महाराष्ट्रात तरी मराठी भाषेच्या वापर वापराचा आग्रह म्हणा किंवा अट्टाहास धरला गेला पाहिजे. मराठी ही आपली मायबोली आहे. मराठी भाषेत बोलताना जो ओघवतपणा आहे तो तुम्हाला इंग्रजी भाषेत मुळीच जाणवणार नाही तसेच मराठी शब्दात तुम्ही तुमच्या भावना मत मांडताना ते अगदी काळजापर्यंत पोहोचत, यात कलात्मकतेने ही भाषा मांडता येते.

मी इंग्रजी भाषेच्या अगदि विरोधात आहे, असा भाग नाही. ठिक आहे, तुम्ही तुमच्या मुलांना इंग्रजी शाळेत प्रवेश घेण्यास उत्सुक असताताच आज ती काळाची गरज आहे. पण आपण आपण मराठी भाषिक लोकच मूळात इंग्रजीला महत्त्व द्यायला लागलो मराठी माध्यमांच्याहि चांगल्या शाळा आहेत तिथे मुलांना प्रवेश घेऊन तुम्ही त्यांना 'स्पिकिंग इंग्लीश कोर्स' ला ॲडमिशन घेऊ शकतात. तसेच इंग्रजी वृत्तपत्र वाचायला द्या, इंग्रजी पुस्तक द्या, पुस्तक द्या.

इंग्रजी माध्यमांच्या शाळेल प्रवेश घेणं कितपत योग्य आहे. ज्या पालकांना A , B , C , D व्यतिरीक्त इंग्रजीतील एक अक्षर ही येत नाही ते ही मुलांना इंग्रजी शाळेत घालतात. परंतु तुम्ही घरात त्यांच्याशी इंग्रजीतून, बोललात का? तर नाही यात मुलांना 'धड, घर का ना घाट का' अशी परिस्थिती होते. समाजातील रोजच्या

बोलण्यातील उठण्याबसण्यातील वापर भाषा मराठी आणि शिक्षणाची भाषा यात मुलांची तारांबळ होते.

मराठी ही आपली माय आहे मराठीचे पाहिले अक्षर अ पासून सुरू होते तर 'ज्ञ' पर्यत संपते म्हणजेच माणूस हा अज्ञानातून ज्ञानापर्यत जाण्याचे काम करतो ते मराठीतून होते तेथूनच त्याला ज्ञान प्राप्त होते. मराठी भाषा ही राजभाषा म्हणून ओळखावी यासाठी विधानसभेत वेळोवेळी आपले लोकप्रिय नेते प्रयत्न करता आहे त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन किमान पहिली ते दहावीपर्यत तरी मराठी भाषा ही अनिवार्य आहे हा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

मराठी भाषा ही हजारो वर्षांपूर्वीही होती राजा सातवाहनच्या दरबारात ही मराठी भाषेतून राजकीय व्यवहार होत असत. शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेकानंतर त्यांच्या दरबारात मराठी भाषिक प्रशासन होते. मराठीत लेखकांनी खूप दर्जेदार साहित्य लिहीले त्यात विंदा करंदीकर असतील, पु. ल. देशपांडे, कुसुमाग्रज वि. वा. शिरवाडकर, आनंद यादव असे अनेक कवी लेखक होऊन गेले यांचे कथा, कादंबऱ्या, लेख प्रसिद्ध आहे.

''ही मायभूमी ही जन्मभूमी
ही कर्मभूमी ही आमुची महा
वंदनीय अति प्राणप्रिय
ही माय मराठी आमुची
हा आमुचा आहे बाणा
ही आमुची आहे मराठी''

अशा काहीशा ओळींना मराठी भाषेची महती सांगण्यात आली आहे हे काव्य ऐकून नक्कीच मराठी माणसाचे नसानसांतील रक्त आपल्या मराठीसाठी सळसळत राहील.

महाराष्ट्र राज्याची भाषा म्हणजे मराठी संपूर्ण भारतात बोलल्या जाणाऱ्या भाषापैकी मराठी ही तिसऱ्या क्रमांकाची भाषा होय. २७ फेब्रुवारी हा 'मराठी राजभाषा दिवस' म्हणून आपण साजरा करतो तसेच कुसुमाग्रज यांचा ही वाढदिवस असतो. आपली मराठी भाषा समृद्ध वारसा असणारी आहे. मराठी वाचवायची असेल तर मराठी माणसांनीच एकत्र येउन ती वाचवायला पाहिजे. मराठीतून मोठमोठ्या अभ्यासिका उघडल्या पाहिजे. मराठी ही प्रमाणभाषा म्हणून पाहतो, तर आपल्या मराठीच्या अनेक बोली भाषा आहे त्यात वऱ्हाडी बोली, नागपुरी बोली, मावची, तावडी, कोकणी या अनेक मराठीच्याच बोलीभाषा आहे.

आजच्या तरुण पिढिला इंग्रजी भाषेची भुरळ पडली आहे. मराठी भाषा बोलणे, शिक्षण घेणे. मराठीचा वापर करणे हे आपले आद्य कर्तव्य बनले पाहिजे. तरच मराठीचा ऱ्हास होणे थांबेल आणि मानाचा आताच ताज्या याचा घडामोडींमध्ये मराठी भाषेला लढा चालू होता. त्यात आपल्याला यश आले आहे.

राज्यातील स्थानिक प्राधिकरणाच्या कामकाजात मराठी भाषेचा वापर सक्तिचा करण्यासंदर्भात 'महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरणे (राजभाषा) अधिनियम २०२२ विधेयक' २४ मार्च २०२२ रोजी एकमताने मंजूर करण्यात आले. यामुळे राज्यातील सर्वच सरकारी कार्यालयांच्या कामकाजात मराठी भाषा अनिवार्य झाली आहे. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आहे त्यानंतर राजभाषा अधिनियम १९६४ जानेवारी १९६५ मध्ये मंजुर आणि यात २०२२ मध्ये मराठी भाषेला मान मिळाला. ग्रामपंचायत, सरकारी कार्यालये, जिल्हा परिषद, शाळा, एमआयडीसी, सिडको यांचे शेरे, टिपण्या, अभिप्राय, योजना कार्यक्रम, धोरण, प्रसिद्धिपत्रके, संकेतस्थळे, पोर्टल यात सुद्धा माता मराठी हि अनिवार्य करण्यात आली आहे.

मराठी भाषेला एक प्रकारचा लय आहे, नऊ रस त्यात भरले आहे. त्याचप्रमाणे माझ्या मराठीत ओघवतेपणा आहे. तसेच कणखरतेचा बाणा हि माझ्या मराठी भाषेत आहे. मराठी भाषेचे संवर्धन हि एक आहे काळाची गरज बनली आहे. मराठी भाषेचा गौरव करताना संत ज्ञानेश्वर म्हणतात....

''माझा मराठिची बोलू कौतुके।
परि अमृतातेहि पैजासी जिंके।
ऐसी अक्षरी रसिके । मेळवीन।''

संत ज्ञानेश्वरानी गीतेचे निरुपण मराठी भाषेतूनच केले आहे. त्यांना मराठी भाषे विषयी निस्सीम प्रेम होते. अशी ही माझी मायबोली मराठी तिच्याबददल कितीही मत मांडल लिखाण केल तरी तिची महती न संपणारी आहे.

।।जय महाराष्ट्र जय मराठी।।

# निर्भया

– भावना वामन झाडगे
बी.एड प्रथम वर्ष (स्वलिखित लेख)

निर्भया बाप रे! हा शब्द जरी नुसता उच्चारला ना तरी अंगावर शहारे आल्याशिवाय राहत नाही. आजची निर्भया खरंच सुरक्षित आहे का? निश्चितच प्रत्येकाच उत्तर नाही आहे.

''जीवन हि एक अशी दोर आहे
तोल गेला तर हरून जातो
आणि सांभाळला तर जिऊन जातो.''

हि परिस्थिती का निर्माण झाली? या साठी कोण जबाबदार आहे? असे एक ना अनेक प्रश्न आपल्या मनात घर करून राहतात आपल्या प्रश्नाचे उत्तर आपल्याला भेटत नाही. तोच आणखी एक ना अनेक निर्भया पुन्हा निर्माण होतात. यावर उपाय काय करावे ज्याला त्याला प्रश्न पडलेला असलो यासाठी धावपळीच्या, धकाधकीच्या जिवनात आजची बदललेली मानसिकता सर्वात जास्त कारणीभुत ठरते. आज प्रत्येकाला तारेवरची कसरत करावी लागत आहे.

आजच्या युगात स्त्री ही अजिबात सुरक्षित नाही, ती घरातून काही कामानिमित्त बाहेर गेली किंवा नोकरी करणाऱ्या महिला महाविद्यालयीन युवती नीट संध्याकाळी व्यवस्थितरीत्या परत येतीलच याची शाश्वती आता राहि-ली नाही. पावलोपावली राक्षस चावा घ्यायला बसलेले असतात. स्त्रीयांकडे बघण्याच्या दुष्टीकोनच जणू बदलून गेला, मोर्चे निघतात कँडल मोर्चा, आंदोलन निदर्शने होतात त्यात राजकारणी नेते, पुढारी आपआपली पोळी भाजून काढतात ४-८ दिवसात सर्वच जण विसरून जातात.

या नराधमांसाठी कितीही कायदे तयार झाले, तरी त्यांना तसुभरही फरक पडत नाही. आपण म्हणतो 'पुढच्याच ठेस मागचा शहाणा' या म्हणीप्रमाणे वागण्याचा कल नाही तर मागचा उलट त्यापेक्षा एक पाऊल पुढे असतो. आपण, आज पाश्चिमात्य अनुकरण करतोय, आज स्त्रियांना सर्व बाबतीत स्वातंत्र्य आहे. पण त्या स्वातंत्र्या बरोबर आपण आपले नैतिक मूल्य मर्यादा सोडून वा-गतोय. आपल्या भारतीय संस्कृतीतील नीतीमूल्ये आपण जोपासत नाही. लोकांची नितीमत्ता आज खालावली आहे या फास्टट्रॅकच्या जमान्यात आपण जणू आकाशाला गवसणी घालण्याचा प्रयत्न करतोय पण त्या नादात आपण आपली संस्कृती आपली मूल्ये पायी तुडवत आहे आणि पुढे जात आहोत.

प्रसारमाध्यमे, वृत्तपने, टि. व्ही. मोबाईल या माध्यमाचा सर्रास वापूर सुरू आहे. त्यात जे चांगल घेण्यासारखं आहे. ते न घेता वाइट घेण्याचा कल आजच्या युवापिढीमध्ये आता दिसून येतो. त्यावर कोणाचे बंधन नाही. मर्यादा नाही. पावलापावलांवर आज नराधम बसलेले आहे आणि ते केव्हा कोणाचे लचके तोडतील हे सांगता येत नाही. माणुसकीला काळीमा फासणारे वर्तन हे नराधम करतात स्त्री म्हणजे यांच्यासाठी उपभोगाची वस्तु बनली आहे. तिच्याकडे फक्त वासनेच्या नजरेने बघीतल जात.

जो व्यक्ती स्त्रीचा आदर करतो, स्त्रीला दैवी शक्ती मानतो, तिच्या इच्छा आकांक्षाना महत्त्व देतो. तो पुरुष आयुष्यात नेहमी सुखी आत्मसमाधानी असतो ही सत्य परीस्थिती आहे. पूर्वी मर्यादा, रीतीरीवाज पाळले जाय-चे, स्त्रीया घराबाहेर पडत नसत, कोणी गावचे पाटील सरपंच, वडिलधारी मंडळी घरात आल्यावर चहा पाणी पुरुष मंडळी- आणत किंवा स्त्रीया डोक्यावर पदर घेऊन पुढे येत तर, येथे संस्कारमूल्यांच जतन केल जात असे तसेच पूर्वी एकतेमुळे आपलं अस्तित्व कायम राहत असे. आता विभाजनामुळे सर्वांचे पतन झाले. आधी एकत्र कुटुंबपद्धतीमुळे स्त्री-पुरुष यांच्यावर घरातील कुटुंब प्रमुखांचा दबदबा असायचा. २५-३० लोकांचे एकत्र कुटुंब असायचे. त्यात सर्व वयोगटातील लहान-मोठे मंडळी एकत्रित बांधलेले असत. यातूनच त्यांच्या विचारांची देवाण-घेवाण होऊन थोरांच्या कुटुंब प्रमुखाच्या निर्णयाला सर्वमान्य करायचे एकूणच तिन ते चार पिढीचे लोक एकत्र राहत. कुटुंब प्रमुखाच्या निर्णयात कोणी हि पण, परंतु, किंतु नसायचे आज ती परीस्थिती बदलली आहे.

आज एकत्र कुटुंबपद्धती तर नाहीच नाही, पण घरात जर चार, लोके असले तरी ते चार वेगवेगळ्या विचारांचे असतात यात समज कोणामध्ये दिसून येत नाही. जो तो

म्हणतो माझेच खरे पूर्वी दंतकथा सांगणाऱ्या नाग, आजी आजोबांची जागा आता इथे मोबाईल ने घेतली आहे. आईवडिल स्वतःहून त्या मुलांना मोबाईल देतात आणि कौतुकाने सांगतातही नाही त्याला मोबाइल कळतो मोबाईल दिल्यावर शांत होतो. रडत नाही त्याला गेम ही खेळता येतो. अशा पालकांच्या बुद्धीची कीव कराविशी वाटते. आजिने सांगितलेल्या कथांचा इतका चांगला परिणाम होऊन विचार परिवर्तन व्हायचे तर आता मोबा-ईलमध्ये चांगले काय वाईट काय? हेच मुलांना कळत नाही यातून निर्माण होतात निर्भया. कुंभार ज्यावेळी मातीच्या गोळ्याला जसजसा आकार देतो तसा घडा घडत जातो. आपले ही तसच आहे. लहानपणी आपला मेंदू मन अगदी कोराकरकरीत असत, त्यावर एकदा जे कोरल गेलं ते कायमस्वरूपी राहुन त्याच्या वर्तनातूनही ते जाणवतं ते चांगल असो वा वाईट मुल म्हणजे देवाघरची फुल असतात त्यांना आपण बोट धरून चालवायला शिकवतो तेव्हा ते शिकत, म्हणजेच आपण त्यांना ज्या दिशेने नेऊ त्या दिशेने ते जातात. मुलांना घडवत असताना घरातील वातावरणाबरोबर समाजातील मित्रपरीवार शे-जारी, सभोवतालची परिस्थिती याचा प्रभावही मुलांच्या वागण्यातून जाणवलो. त्यातुनच भावी पिढी घडत जाते. म्हणन घरातूनच नीतिमूल्ये मुलांमध्ये रुजवावी लागतात.

पण आज आईवडील दोघेही कामानिमित्त दिवसभर बाहेर असतात. सहा महिन्याच्या बाळापासून आईवडील मुलांना पाळणाघरात ठेवतात, नाहीतर मुल सांभाळण्यास बाई ठेवतात यात कुठे, दंतकथा सांगणारी आजी त्यांना माहित नसते आणि आपली नैतिक मूल्ये रुजवणारी आई-वडील ही दिसत नाही. यातच सर्वकाही आलं त्यामुळे पालकांना त्यांच्या आवडीनिवडी कळत नाही ज्या वयात मुलांना आईवडीलांच्या प्रेम, वात्सल्याची गरज असते त्यावेळी मुल पाळणाघरात असतात. मुलाना जिवापाड जपणार कुणी नसतं. नंतर ते थोडेसे मोठे झाल्यावर कोणला भेटतात. दिवसभर काय करतात. याची खबर आईवडीलांना नसते. यातूनच मुलं वाईट संगतीला लागतात आणि नको त्या प्रकारचे व्यसन त्यांना जडतात.

यातूनच, विकृती निर्माण होते आणि चोऱ्या-माऱ्या, दरोडे, अत्याचार, बलात्कार सारख्या घटना घडतात तसेच स्त्रीयांना स्वातंत्र्य आहे म्हणून पटेल ते करायच हे चुकीच घरातून बाहेर निघण्यास स्वातंत्र्य आहे. तसेच शिक्षणात सवलत आहे. अनेक कायदे स्त्रीयांच्या बाजूने म्हणून मनमानी करण हे ही चुकीच आहे. आपली वेशभुषा आणि केशभुषा भारतीय संस्कृतीला साजेल अशी असावी. काही स्त्रीयांना युवतींना राग येईल पण मैत्रीणीने अशी जिन्स घेतली म्हणून मलाही तशीच पाहिजे. सँडलही अशीच पाहिजे. मोबाईल, शृंगारसाहित्य वस्तु यात येतात.

हेवा दाव्याची विचारसरणी आपल्या मुलींमध्ये आहे. हेवा करायचाच झाला तर तुम्ही अभ्यासाचा करा, करीयर घडवण्याचा करा. इर्षेची वृत्ती सोडा संकोचित राहु नका. मनमोकळेपणे जगा.

एखादी युवती सडपातळ बांध्याची आहे म्हणून पण तिला जिन्स शोभेलही कदाचित! जर एखादी मुलगी स्थूल आहे तिलाकशी जिन्स शोभेल, ती मुलगी पुढे गेल्यावर मागे मुलांच्या घोळक्यात जे विचित्र शब्द ऐकायला येतात. ते भयंकर घाणेरडे, किळसवाणे असतात. हि आजची परीस्थिती आहे. जर फॅशन केली तरच कोणी ओळखेल? नाहीतर काकूबाई म्हणेल अस तर नाही ना! साधी, राहणी उच्च विचारसरणी ठेवा. आपल्याला शोभेल असाच पेहराव आपण ठेवावा. काही अंशी आपण ही त्यास तितकेच जबाबदार आहोत. फॅशन करा पण आपल्याला शोभेल अशीच 'पचेल तेवढेच खावे आणि शोभेल असेच रहावे' भारतीय स्त्रीयांचा, मुलींचा पेहराव इतका सुंदर आहे. खरच पण आपण पाश्चिमात्य संस्कृतिचं इतकं अनुकरण करतोय त्याचा आपल्यावर इतका प्रभाव झाला आहे की मूळ भारतीय संस्कृतीचे पाळंमुळंच आपण स्वतः उखडवत चाललोय आपली नैतिक मूल्य, संस्कृती, हे सर्वकाही लोप पावताना दिसत आहे.

उठा! तरुणांनो जागे व्हा भारत वाचवा संस्कृती वाचवा, मूल्ये जोपासा.

# हास्यतरंग

**– भावना वामन झाडगे**
बी.एड प्रथम वर्ष

**पति :** आज घर खूप छान आवरलेले दिसतेय,
तुझं व्हॉटसअप बंद होत का आज?

**पत्नी :** नाही हो...
फोनचा चार्जर सापडत नव्हता तोच शोधण्याच्या
नादात घर, आवरलं नाहीतर मला वेळ कुठे असतो.
हा...हा...हा...हा...हा...

तुमचं इंग्रजीवर किती ही प्रभुत्व असल तरी
कुत्रे पाठीमागे लागल्यावर हाड...हाड...कराव लागत
Excuse me म्हणून चालत नाही.
हा...हा...हा...हा...हा...

एकदा एक कंजुस जंगलातून जात असतो
तेवढ्यात त्याच्या पायात काटा घुसतो...
कंजूस काटा काढत, स्वतःशीच म्हणतो
आयला बरे झाले चप्पल घालून नाही आलो ते
नाहितर चप्पलला होल पडले असते.
हा...हा...हा...हा...हा...

माणसाचा जन्म होतो खाटावर
लग्न होत पाटावर
तेराव होत घाटावर
पण आयुष्यभर लक्ष मात्र नोटांवर

# कौतुकावर अंकुश

**– किशोर हरी चव्हाण**
द्वितीय वर्ष बी.एड.

प्रशंसा, पुरस्कार, सन्मान कोणाला नको असतात, हल्लीच्या डिजिटल युगात तर एकेका लाईक्स, कॉमेन्ट्साठी अनेक जण रात्र-रात्र जागून काढताना चारचौघात आपले कौतुक व्हावे, सन्मान मिळावा असे वाटणे ही तर मानवाची सहजवृत्ती, 'आम्ही' कवतिकाचे धनी असे तुकोबांनीही म्हटले आहे. मात्र हे कौतुक कधी, कुठे, कोणाकडून आणि कशासाठी? या चार 'क' करांची समर्पक उत्तर मिळत नाहीत, तोवर कोणताही पुरस्कार स्वीकारणे इष्ट नसते. तेवढे तारतम्य अंगी, असावे लागते. परंतु अशा शहाणपणाचाच विसर पडल्याने हल्ली पुरस्कार आणि कौतुक सोहळ्याचे पेव फुटले आहे. साहीत्यिक, कलावंत, प्रज्ञावंत खेळाडू अथवा सामाजिक क्षेत्रात कार्य करणा पाठीवर कौतुकाची थाप पडली तर त्यात वावगे असे काही नाही. समाजातील अशा घटकांचे कौतुक व्हायलाच हवे. परंतु एखाद्या अज्ञात अशा खाजगी संस्थेकडून पुरस्कार स्वीकारून आपली पाठ थोपडून घेण्यात सरकारी अधिकारीही मागे नसतात.

त्यामुळेच की काय शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांना यापुढे कोणत्याही संस्थेकडून पुरस्कार स्वीकारण्यापूर्वी सरकारची परवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले शिवाय असे पुरस्कार फक्त प्रशस्तीपत्र अथवा सन्मानचिन्ह अशा स्वरुपातच स्वीकारता येतील रोख रक्कम, सोने, चांदी वा इतर कोणत्याही मौल्यवान धातू स्वरूपातील सन्मानचिन्ह वा वस्तू स्वीकारता येणारे नाही. अशा प्रकारची नियमावली राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने नुकतीच जारी केली आहे. या निर्णयामागचा हेतू स्पष्ट करण्यात आला नसला तरी स्वच्छ पारदर्शक प्रशासनासाठी अशाप्रकारच्या शर्तींची गरज होतीच. कारण कोणतेही तारतम्य न ठेवता सरसकट कौतुक स्वीकारण्याची चढाओढ सध्या फारच बोकावली आहे. पुरस्कारासाठी

नव्या अटी आणि लागू करण्यामागे कदाचित हा गोंधळ, वाद टाळण्याचा हेतू असावा. पुरस्कार स्वीकारण्या संदर्भात जसे नियम केले आहे आहेत, तसे पुरस्कार देणाऱ्या संस्थेविषयीदेखील काही पूर्वअटी घालण्यात आल्या आहेत. वास्तविक, अखिल भारतीय सेवा नियम : १९६८ च्या नियम १२ मध्ये भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांनी खाजगी संस्थेकडून पुरस्कार स्वीकारताना काय खबरदारी घ्यावी या संदर्भात स्पष्ट तरतूदी आहेत परंतु या अटीची सर्रास पायमल्ली होताना दिसते.

विशेषतः नागरी बँका, साखर कारखाने, पतसंस्थाचे पदाधिकारी पुरस्काराच्या नावाखाली परदेश दौरे करत असतात त्यावर लाखो रुपये खर्च होतात जनतेच्या पैशाची ही उधळपट्टी आहे. त्यावरही आता सहकार आयुक्तांनी अंकुश आणला हे बरे झाले. सरकारी अधिकारी असो वा सहकारी संस्थेतील पदाधिकारी त्यांनी चांगले कार्य करणे अपेक्षित असते, परंतु नक्षलवाद्यांशी लढा, दंगली, महापूर अशा प्रतिकुल परिस्थितीत जिवाची बाजी लावून काम करणाऱ्यांच्या पाठीवर शाबासकीची थापही पडायला हवी. राज्यातील नामांकीत संस्था त्यांचा गुणगौरव असतील तर सरकारची त्यात हरकत नसावी.

**तात्पर्य :** नियंमाच्या वरवंटच्याखाली समाजातील चांगुलपणा भरडला जाऊ नये।

संग्रहीत लोकमत २४ नोव्हेंबर २०२१

# माझा जिल्हा माझा अभिमान

**– मगर अंकिता विजय**
प्रथम वर्ष बी.एड.

तापी, गिरणा बोरीच्या पाण्याने
सुजलाम् सुफलाम् माती
केळी, बोर लिंबूसाठी प्रसिद्ध
आहे जळगाव जिल्ह्याची ख्याती...१

जिल्ह्यात आहे पंधरा तालुके
सातपुड्याची सिमा विस्तिर्ण
अजिंठा डोंगररांगांनी खुलते
माझ्या जिल्हयाचे सौंदर्य संपूर्ण...२

समाधी सखाराम महाराजांची
अमळनेरचे ते प्रति पंढरपूर
असे सानेगुरुजींची कर्मभूमी
संशोधनासाठी तत्त्वज्ञान मंदिर...३

खान्देश कवी येथील प्रसिद्ध
ना. धों. महानोर अन् बालकवी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची
कवी बहिणाबाई ओळख नवी...४

पाल आहे थंड हवेचे ठिकाण
यावलचे अभयारण्य छान
हतनूर धरण सर्वात मोठे
जळगावकरांना त्याचा अभिमान...५

अमळनेर मंगळग्रह मंदिर
फरकांड्याचे झूलते मनोरे
मनुदेवी अन् गणपती पद्मालय
उनपदेव गरम पाण्याचे झरे...६

भास्कराचार्य प्रसिद्ध गणितज्ज्ञ
पाटणादेवी पितळखोरा लेणी
संत चांगदेव अन् मुक्ताबाई
पारोळ्याची शूर झाशीची राणी...७

उदयोगपती भवरलालजी जैन
जैन हिल्स, गांधी निर्माते
सरकारी वकील उज्ज्वलजी निकम
राज्यावरती त्यांचे नाव शोभते...८

उत्तमराव पाटील, लिलाताई
क्रांतिकारक नाव शोभते
रामयणकार वाल्मिकी वालझरीचे
पौराणिक काळी पांडवही राहिले होते...९

ऐतिहासिक पौराणिक महत्व
जैन, विप्रो कंपनीस जगात मान
आम्ही जळगावकर असल्याचा
नेहमीच वाटतो आभिमान...१०

(संग्रहित) सौ. सुनिता रत्नाकर पाटिल (अमळनेर)

# महाराष्ट्र देशा

**– माधुरी चौधरी (औरंगाबाद)**
**– रोमाली अशोक वाघुळदे,** प्रथम वर्ष बी.एड.

कुणखर देशा, काटक देशा, महाराष्ट्र देशा
संतांच्या देशा, विरांच्या देशा, शिवरायांच्या देशा

साधुसंतांनी गायली येथील मातीची गाणी
दऱ्याखोऱ्यांतून दुमदुमली येथे जयघोषाची वाणी

कुठे डफावर थाप मारुनी शाहीर गातो पोवाडा
ठसकेबाज लावणीचा येथील शृंगारच वेगळा

मराठमोळी भाषा अमुची मराठमोळा वेब
नऊवारीच्या पातळामध्ये सौंदर्य खुले विशेष

सातपुडा अन सह्याद्री अमुच्या महाराष्ट्राची शान
तापी गोदावरीने बनवले या सुजला सुफलाम

पंढरपुरचा विठू सावळा उभा विटेवरी
दिंड्या पताका घेऊन नाचतो बघा वारकरी

तळहातावर प्राण घेऊनी सज्जवीर सत्वर
देशासाठी प्राण अर्पण्या आम्ही सदैव तत्पर

आसमानी संकट असो व असो ही माहामारी
शेकडो देव हे तारण्या आम्हा उतरले रस्त्यावरी

कष्टकऱ्यांचे हात आमुचे घाम गाळूनी खातो
नसानसांमध्ये राष्ट्रप्रेम जय जय महाराष्ट्र गातो

# माहेर

**– माधुरी चौधरी (औरंगाबाद)**
**– रोमाली अशोक वाघुळदे,** प्रथम वर्ष बी.एड.

माझ्या माहेरी अंगणी
फुलतोच पारिजात
माय सासरी नांदते
लेक येते माहेरात

बाप राबतो शेतात
पानी झुयझुच बाहे
भाऊ जुंपतो नांगर
गान आनंदानं गाये

सुख नांदते उंबरी
झोका वडाले दारात
गाय कपिला हंबरे
चाटे वासरा गोठ्यात

येते आठव लेकीचा
ओली मायची पापनी
लागे पदर डोयाले
पानी वाहता लोचनी

# A Soldier's Daughter...

**- Lulla Bhavana Haresh**
**- Patil Sonali Pandurang** F. Y. B. Ed.

When I first came into this word
You Could not be there
But mummy promised every night.
That you would always care...
Each day I grow a little more
And I'm beginning to look like you
Mommy always says you love me
And daddy and love you too.
Don't think that I am mad at you
My heart is full of fear.

but daddy and forgive you
And want to make that clear.
I know each day you think of me
And wish you could come home
Each day you also fight for me
So that I am free to room.
You should know I miss you daddy
and I really need you near.
So please be safe at least un til.
the next time you are here.

# ओझोन छत्री का महत्त्वाची आहे?

– माधुरी चौधरी (औरंगाबाद)
– रोमाली अशोक वाघुळदे, प्रथम वर्ष बी.एड.

**जागतिक ओझोन दिन त्यानिमित्त...**

मानवाने आपल्या बुद्धीच्या जोरावर विज्ञानाच्या साहाय्याने अनेक नैसर्गिक गोष्टींचा उलगडा केला आहे. परंतु पृथ्वीवर जीवन का आहे? असा प्रश्न विचारला तर लगेच उत्तर येते ते पृथ्वीवर पाणी व ऑक्सिजन आहे म्हणून पाणी व ऑक्सिजन प्रमाणे जर वातावरणात ओझोन वायू सूर्याच्या अतिनील किरणांपासून आपले संरक्षण करतो. पावसाळ्यात छत्री आपले संरक्षण करतो. पावसाळ्यात छत्री आपले संरक्षण करते त्याचप्रमाणे ओझोन समुद्रसापटीपासून १५ ते ४० किलोमीटर उंचीवर छत्रीप्रमाणे पृथ्वीच्या भोवती पसरलेला आहे. ओझोनचे अवकाशातील प्रमाण एकूण वातावरणाच्या केवळ ०.००००६% इतके आहे. मानवनिर्मित रासायनिक घटकांमुळे ओझोन थराचे नुकसान होते.

ओझोन संरक्षणाच्या उद्देशाने १६ सप्टेंबर हा दिवस जागतिक ओझोन दिन म्हणून साजरा केला जातो. १९८७ साली याच दिवशी 'मॉन्ट्रियल करार' झाला ध्रुवीय प्रदेशांत सहा महिने दिवस आणि सहा महिने रात्र असते. विशेषत: अंटार्टिकाच्या वैशिष्ट्यपूर्ण हवामानामुळे तेथील वातावरणात ओझोनचे होल (छिद्र) आढळते. ओझोनचे छिद्र तयार होण्यास मुक्त क्लोरोफ्लुरोकार्बनचे (सी. एफ. सी) रेणू जबाबदार असल्याचा पुरावा वैज्ञानिक क्रुटझन, मोलिना आणि रॉलँड यांनी १९८४ मध्ये नोंदविलेल्या दक्षिण ध्रुवाच्या ओझन छिद्राच्या निरीक्षणाने दिला आहे. वातावरणातील सी. एफ. सी. चे रेणू अतिनील किरणांच्या प्रभावामुळे विघटित लोकन क्लोरिनचे अणू उत्सर्जित करतात. हे क्लोरीन अणू मोठ्या प्रमाणात स्थितांबरीय ओझोनचे विघटन करतात. या संशोधनासाठी क्रुटझन, मोलिना आणि रॉलँड यांना १९९५ साली नोबेल पुरस्कार देण्यात आला. सर्वप्रथम १९३० साली चॅपमन या शास्त्रज्ञाने स्थितांबरीय ओझोनच्या निर्मितीमध्ये अतिनील किरणांचे योगदान व त्यांची रासायनिक अभिक्रिया जगासमोर मांडली.

अलीकडच्या निरीक्षणातून हे सिद्ध झाले आहे की ओझोनला पडलेले छिद्र कमी होत आहे. मॉन्ट्रियल कराराद्वारे क्लोरोफ्लुरो कार्बनच्या उत्पादन व वापरावर संपूर्णपणे बंदी आणणे, त्यांना पर्याय निर्माण करणे वगैरे अशी योजना आखली गेली. या करारामध्ये भारत सुद्धा एक पक्ष म्हणून काम करीत आहे व ओझोनच्या संरक्षणासाठी ओझन नष्ट करणारे पदार्थ (ओ. डी. एस.) फेज-आउट कार्यक्रम भारत यशस्वीपणे राबवत आहे. भारताने २०१५ व २०२० च्या सुधारणेच्या टप्प्याचे लक्ष पूर्ण केलं आहे.

पृथ्वीच्या वातावरणात अनेक थर आहेत त्यापैकी दोन धरांमध्ये ओझोनचे अस्तित्व सापडते. साधारणपणे समुद्र सपाटीपासून १ ते २ किमी उंचीच्या पट्ट्यात तपांबरीय ओझोन (सजीवांसाठी अपायकारक) व १५ ते ४० हो किमी उंचीच्या पट्ट्यात स्थितांबरीय ओझोन (सजीवांसाठी उपयुक्त) आढळतो. ओझोनच्या वातावरणातील एकूण प्रमाणाच्या १०% ओझोन तपांबरात तर उरलेला ९०% ओझोन स्थितांबरामध्ये आढळतो. ओझोन हा ऑक्सिजनपासून तयार होत असल्याने तपांबरीय ओझोन हवेतील कमी करतो त्यामुळे छातीत दुखणे घशामध्ये खवखवणे घुसमटल्यासारखे वाटणे असे निरनिराळे आजार होऊ शकतात. वाढते तापमान व वायू प्रदूषण यांच्यामुळे तपांबरीय ओझोनची वाढ होत आहे.

पृथ्वीलगत आढळणारा १० टक्के तपांबरीय ओझोन वाढू नये याकडे सर्वांनीच लक्ष दिले पाहिजे अलीकडे ध्रुवीय भागात ओझोनचे छिद्र भरल्याचे निरीक्षणास आलेआहे याची सुरुवात २०१८ पासून झाली असून ती २०३० पर्यंत पूर्ण होईल असा दावा काही वैज्ञानिकांकडून केला जात आहे.

# रक्षाबंधन

– **सुवर्णा छगन अंभोरे**
प्रथम वर्ष बी.एड.

रेशमाच्या त्या नाजुक धाग्यांची
जुळतातू ती प्रेमळ नाती

ती असावी गुलाबाची कळी
क्षणा– क्षणाला उमलती अन

मावळती असती ती मायलेकरांच्या
उमलत्या नात्याची

अचानक होताततित बेधुंद लहरी
असती त्यात प्रेमाची गोड गोडवी

गोड गोजिरी फुलराणी
त्या ऋणानुबंधाच्या प्रेमळ

नात्यांची वाट पाहते ती
बहीन अन् भावाची नाती

# दान

– **सुवर्णा छगन अंभोरे**
प्रथम वर्ष बी.एड.

रंग सारे सृष्टीचे ते रंगवावे
जीवना दृष्टिहिनाच्या सुखवावे

बोल त्या मुक्या फुलांचे
ओठावरी तुमच्या फुलावे

भावना जाणून त्याच्या
सूर अंतरीचे जुळावे

अंधारतांना सांजवेळी
दीप होऊनी जळावे

पामराच्या दुबळ्या मना
जिद्दीने तु पेटवावे धनधान्य
सुवर्णाचे दान दुसऱ्या काय म्हणुनी?

# मैत्री

– **सुवर्णा छगन अंभोरे**
प्रथम वर्ष बी.एड.

मैत्री असावी ती चाफ्याप्रमाणे
न रुसणारी दुःखाची चाहुल देणारी

ऐकायला मधुर शब्दसुमनांची मैत्री
क्षणाची असावी साथसंगती मैत्रीची

नको ती हितगुज करणारी
प्रेमाची साऊली मैत्री
दुधाची साय मैत्री
मैत्रीच्या या बंधनाची फुलावी कळी मैत्रीची

प्रकाशमान दिव्याची
साऊली का मैत्री ?

गुलाब अन मधुराणी
मैत्रीची मधुराणी

देहाची साउली मैत्री
अशी असावी मैत्री

# आई

– **सुवर्णा छगन अंभोरे**
प्रथम वर्ष बी.एड.

प्राकाशमान द्विव्याची ज्योत आई
चंद्रभागेचे हास्य आई
घराची वरलक्ष्मी आई
उंबरठ्याची रेखा आई
चमकणारा तारा आई
गीतेपेक्षा पवित्र आई

फुलाचा सुगंध आई
साता जन्माची शिदोरी आई
गाण्याचा स्वर आई
सुर्याचा किरण आई
आकाशाहुन उथळ मन आईचे

# रेतीचा कण

– सारिका प्रकाश कोळी
द्वितीय वर्ष बी.एड.

रविवार होता, म्हणून आम्ही लवकरच बाहेर पडलो. नदीकाठचा देखावा आम्हाला पाहावयाचा होता. तेथील वाळवंटांत बसून दुरून पाण्याच्या सुंदर धबधब्याची शोभाही पाहावयाची होती.

नेहमीपेक्षा आज वारा जास्त वाहत होता, पण उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे तो सुखकर वाटत होता आम्ही नदी गाठली वाळवंटांत बसून धबधब्यांतील पाण्याचे मजेदार रंग पाहू लागलो.

मुले इकडे तिकडे खेळू लागली मुलांना स्वतंत्रपणे बागडावयास मिळाले होते. त्यांची धावाधावी व पकडापकडी सुरू झाली होती. इतक्यात 'अग आई ग!' असे शकूचे ओरडणे माझ्या कानी आले. मी तसाच धावत आले आणि काय झाले? म्हणून विचारले.

'कशाला केली ही रेती कुणाला ठाऊक! अयाई ग... अयाई !' अशी शकूची सारखी बडबड चालली होती. ती एका हाताने डोळा चोळीत होती. मी ताडले की, रेतीचा कण डोळ्यांत गेला आहे.

मी लगेच तिला जवळ घेतले डोळा हातांनी उघडून एक-दोनदा जोराने फुंकर मारले मग डोळा मिटून पापण्यावरून हळूवारपणे हात फिरवीला त्यामुळे रेतीचा कण बाहेर निघून गेला. पण डोळ्यांचा त्रास मात्र सर्वस्वी कमी झाला नाही. नंतर मी तिला नदीच्या पाण्याजवळ नेले आणि डोळा धुऊन स्वच्छ केला तेव्हा तिला अमळ बरे वाटले.

मी विचारले काय बरे वाटत ना आता? 'हो ! बरे आहे. पण ही कशाला केली रेती इथे कुणाला ठाऊक ! किती त्रास झाला मला त्या एका लहानशा कणामुळे.' तिचे ते बोलणे ऐकून मला हसू आले ते पाहून ती म्हणाली, का हसलात। बरे वाटले तुम्हाला? तिच्या या बोलण्यामुळे माझे हसे आणखीनच वाढले मी म्हणालो, मला बरे वाटले असे नव्हे.

पण ही रेती कशाला केलीस ह्या तुझ्या वेडेपणाच्या प्रश्नांचे मात्र मला नवल वाटले व त्यामुळे हसू आले.

काय? माझा प्रश्न वेडेपणाचा! शकू बोलली त्यावर मी म्हटले, वेडेपणाचा नव्हे तर काय? हा एक रेतीचा कण तुझ्याच किती उपयोगी पडतो याची कल्पना नाही तुला म्हणून तू असे बोलतेस! शकू म्हणाली – मग, आम्ही परत निघालो वाटेत आले विटांचा कारखाना मी तेथे थांबले आणि विटा पाहून, काही खरेदी करून त्या गाडीतून पाठवून देण्यास कारखानदारास सांगितले.

शकू विटा पाहत होती मी तिला म्हटले, शकू या विटा कशा तयार होतात, ते पहा ते मातीचे कण! त्यांची धूळ उडते आपल्या डोळ्यांत किती वाईट वाटते आपल्याला! पण ह्याच कणांचा चिखल करतात नंतर त्याच्या विटा बनवितात त्या भाजतात आता आपली भीत पडली आहे ना, ती बांधण्याकरीता मी विटा घेतल्या. माती काय, किंवा रेती काय, कणा कणांनी बनते त्या कणांचा असा उपयोग होतो!

असे आहे काय? मग हे कण फार उपयोगांचे आहेत शकू म्हणाली मी म्हटले – शकू, तू विचार कर म्हणजे रेतीच्या कणांचा तुला कसा व किती उपयोग होतो हे कळेल. हे बघ तुझा आरसा रेतीच्या कणांचाच! बरण्या, दगड्या, कप-बशा या रेतीच्याच ! घरे, भिंती हयात रेतीचा उपयोग आहेच. आणखी किती उपयोग होत असतो या रेतीच्या कणांचा ते थोडक्यात सांगता येण्यासारखे नाही!

शकू म्हणाली, 'हो आता आले माझ्या ध्यानात उगीचच नावे ठेवली मी रेतीच्या कणाला तर !!'




मौलाना अबुल कलाम आझाद जयंती
राष्ट्रीय शिक्षण दिन समारंभ



महाविद्यालयातील उद्‌बोधन कार्यक्रम



प्रा. चव्हाण, सह संचालक, उच्च शिक्षण,
जळगाव यांच्या सोबत सहविचार सभा




वक्तृत्व विकास कार्यशाळा



विद्यार्थी आरोग्य तपासणी व
कोरोना लसिकरण कार्यक्रम



राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम



शारीरीक शिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेश
चाचणीचे आयोजन




शारीरीक शिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेश
चाचणीचे आयोजन



स्थानिक चौकशी समितीद्वारे
महाविद्यालयातील सुविधांचे गुणांकन



राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम




राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० विषयावर
आयोजित उद्‌बोधन वर्ग



शारीरीक शिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेश
चाचणीचे आयोजन



प्राध्यापक प्रबोधिनी अंतर्गत
प्रा. गुल्हाणे, अमरावती यांचे व्याख्यान




प्राध्यापक प्रबोधिनी अंतर्गत
प्रा. गुल्हाणे, अमरावती यांचे व्याख्यान



शारीरीक शिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेश
परिक्षेचे आयोजन



जळगाव विभाग आंतरमहाविद्यालयीन
महिला हॅन्डबॉल स्पर्धा



आहार व पोषण विषयावर आंतरराष्ट्रीय
परिसंवाद



राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत
वृक्षारोपण



गुणवंत विद्यार्थ्यांना विशेष शिष्यवृत्ती वाटप




संशोधन विभागांतर्गत विशेष उपक्रम



माजी विद्यार्थी शिवव्याख्याता जावेद शेख याचा सत्कार



कबचौ उमवि, आंतरविद्याशाखा अधिष्ठानापदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक राणे यांची निवड



शरीरीक शिक्षण अभ्यासक्रम उद्‌बोधन



राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत स्वच्छता उपक्रम

# खोप्यामधी खोपा

**संग्रह – सारिका प्रकाश कोळी**
द्वितीय वर्ष बी.एड.

अरे खोप्यामधी खोपा
सुगरणीचा चांगला
देखा पिलासाठी तिनं
झोका झाडाला टांगला

पिलं निजली खोप्यात
जसा झुलता बंगला
तिचा पिलामधी जीव
जीव झाडाले टांगला

खोपा इनला इनला
जसा गिलक्याचा कोसा
पाखरांची कारागिरी
जरा देख रे मानसा

तिची उलूशीच चोच
तेच दात, तेच ओठ
तुले देले रे देवानं
दोन हात दहा बोटं
– बहिणाबाई चौधरी

# सांज

**– विशाखा उंटवाल**
प्रथम वर्ष बी.एड.

संध्याकाळी एका मुक्त मी
अशीच होती मुग्ध मी
अशीच जाता वर नजर
क्षणात झाली स्तंभित मी

वर होते निळसर आकाश
पसरला तेथे संधीप्रकाश
काळोखास होता थोडा अवकाश
तरी पण झाली उदास मी

निळसर छटा गुलाबी झाली
पाहताच संध्या फुलून आली
माझ्याही मनाची कळी उमलली
क्षणातच झाली अवखळ मी

सुगंधीत अशी झाले जरी
उधळले गुलाल कुणी अंबरी
कस्तुरी सांडली का अंतरी
विचारी याच मग्न मी

बघता बघता प्रकाश ओसरला
क्षणात सारा काळोख पसरला
एकच धागा मनात धरला
चांदण्याची वाट पाहते मी

आली वर ही पुनवेची कोट
मनी माझ्या नाचतो मोर
तारकांची असे शीतल साथ
चांदण्याची मधुर बरसात
अशा समयी का रहावी एकटीच मी ?

# जिवन म्हणजे काय?

**– चेतना मधुकर वानखेडे**
प्रथम वर्ष बी.एड.

जिवन म्हणजे जिवन ते जिवनच असतं
नवीन काही नसतं ! पण ते हवस वाटत
पण तेच जिवन काहीना नकोस असतं
पण ते खुप छान वाटत

ज्यांना हवस वाटत त्यांना जगावस वाटत
जिवन जगणं सोप नसत
पण ते जगावस लागत कारण,
ज्या जिवनाला अर्थ असतो त्यांना वेळ असतो
आणि ज्यांना वेळ असतो त्यांना अर्थ नसतो

जीवन म्हणजे जिवन ले जिवनच असतं ते
इमानदारीत जगण आपल काम असतं

जिवन खूप सोप्प नसतं,
पण तेवढच ते अवघड ही नसतं
जिवन म्हणजे जिवन म्हणजे जीवनचं असतं
काहीना ले संपावस वाटतं पण तेच जिवन
काहीना संपू नव्हे अस ही वाटत
वेळ जशी निघून जाते

तशी आपल जिवन सुद्धा निघून जातं
जसं जिवन निघून जात तशा मागे
आठवणी राहून जातात.
तसं जिवन सोध वाटु लागतं
जिवन म्हणजे जिवनच असतं
ते खुप सोप्प होऊन जात...

# खरा तो एकची धर्म

**संग्रह – दिक्षा रमेश आठवले**
द्वितीय वर्ष बी.एड.

खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे ।
जगी जे हीन अति पतित,
जगी जे दीन पददलित
तया जाऊन उठवावे, जगाला प्रेम अर्पावे ।। १ ।।
सदा जे आर्त अती विकल,
जयांना गांजती सकल
तया जाऊन हसवावे, जगाला प्रेम अपवे ।। २ ।।
कुणा ना व्यर्थ शिणवावे,
कुणा ना व्यर्थ हिणवावे
समस्ता बंधू मानावे, जगाला प्रेम अर्पावे ।। ३ ।।
प्रभुची लेकरे सारी,
तयांला सर्वही प्यारी
कुणा ना तुच्छ लेखावे, जगाला प्रेम अर्पावे ।। ४ ।।
असे हे सार धर्माचे,
असे हे सार सत्याचे
परार्था प्राणही द्यावे, जगाला प्रेम अर्पावे ।। ५ ।।
– साने गुरुजी

# द काश्मीर फाईल्सच्या निमित्ताने

**संकलन – राज महेंद्र देशमुख**
द्वितीय वर्ष बी.एड.

